आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१८ नोव्हेंबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्र आणि झारखंडमधल्या विधानसभा निवडणुकीसाठी आज प्रचाराचा शेवटचा दिवस

- महाराष्ट्रात ५ लाख रोजगार निर्मितीची क्षमता असलेले ७ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सत्ताधारी महायुतीमुळे इतर राज्यात गेल्याचा राहुल गांधी यांचा आरोप

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज ब्राझिलमध्ये जी–२० शिखर परिषदेला उपस्थित राहणार

- श्रीलंकेच्या प्रधानमंत्री म्हणून डॉ. हरिणी अमरसूर्य यांनी घेतली शपथ

**आणि**

- जीटी खुल्या तिरंदाजी स्पर्धेत ज्योती वेन्नमला सुवर्ण पदक, अभिषेकला रौप्य पदक

**<><><><><>**

विधानसभा निवडणूक आणि लोकसभा पोटनिवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी आज संध्याकाळी थंडावेल. राज्यात यंदा ९ कोटी ७० लाखांहून अधिक मतदार २८८ आमदारांना निवडून देणार आहे. त्यांच्यासाठी १ लाख ४२७ मतदान केंद्र उभारली असून दुर्गम भाग वगळता इतर ठिकाणी सकाळी ७ ते संध्याकाळी ६ पर्यंत मतदान होईल. विधानसभा निवडणुकीसाठी यंदा ४ हजार १३६ उमेदवार रिंगणात असून नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी १९ उमेदवार पात्र ठरले आहेत.

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून राज्यात सुमारे ८० हजार जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई झाली. ५६ हजारांहून अधिक शस्त्र जमा केली असून ६११ शस्त्र परवाने रद्द झाले आहेत. एकूण ६५५ कोटी रुपयांहून अधिक रकमेची मालमत्ता आचासंहिता लागू झाल्यापासून जप्त झाली आहे. त्यात १५३ कोटी रुपये रोख, २८२ कोटी रुपयांचे मौल्यवान धातू यासह इतर गोष्टींचा समावेश आहे. आचारसंहिता भंग झाल्याच्या ८ हजार ३८६ तक्रारी राज्यात प्राप्त झाल्या असून ३३ वगळता इतर तक्रारी निकाली निघाल्या आहेत.

<><><><><>

राज्यात आज संध्याकाळी ६ वाजता प्रचार संपल्यानंतर प्रचारसभा, मिरवणुका आयोजित करता येणार नाही. आयोजित केल्यास आयोजक आणि सहभागी होणारे अशा दोघांवर गुन्हे दाखल होतील. यात दोन वर्षापर्यंत तुरुंगवास अथवा दंड अथवा दोन्ही अशा शिक्षेची तरतूद आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे.  याकालावधीत जाहिराती करतानाही नियमांचं पालन करण्याचे निर्देश आयोगानं उमेदवारांना आणि जाहिराती प्रसारण करणाऱ्यांना दिले आहेत. या निर्देशांचे उल्लंघन झालं तर न्यायालयाच्या आदेशाचा अवमान ग्राह्य धरून कार्यवाही करण्यात येईल, असेही मुख्य निवडणूक अधिकारी यांनी स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रचारही आज संध्याकाळी संपेल. या टप्प्यात ३८ मतदारसंघात मतदान होणार आहे. त्यापूर्वी विविध राजकीय पक्षांनी प्रचारासाठी जोर लावला आहे.

<><><><><>

राज्यातल्या ५ लाख युवांना रोजगार देण्याची क्षमता असलेले ७ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सत्ताधारी महायुतीमुळे महाराष्ट्रातून गुजरातला गेल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत रोजगार, महागाई, महिलांचे प्रश्न यासह महाराष्ट्राची संपत्ती महाराष्ट्राच्या जनतेला मिळणं हेच महत्त्वाचे मुद्दे आहेत, असं सांगून त्यांनी महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यातल्या आश्वासनांचा पुनरुच्चार केला. धारावी पुनर्विकास प्रकल्पासह विमानतळं, संरक्षण उत्पादनं, बंदरं इत्यादींची कंत्राटं उद्योगपती गौतम अदानी यांच्या कंपनीला मिळाल्यावरून त्यांनी सरकारवर टीका केली. धारावीचा पुनर्विकास स्थानिकांचं हित लक्षात घेऊन केला जाईल. हा मुद्दा त्यापेक्षा व्यापक आहे, खारफुटीचं जंगल, मुंबईत येणारा पूर यावरही उपाय करणं गरजेचं असल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली.

**होल्ड बाइट**

भारतीय जनता पार्टी ईडी, सीबीआय, आयकर विभाग इत्यादीचा गैरवापर करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

**<><><><><>**

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा आज प्रचारासाठी राज्याच्या दौऱ्यावर असून ते बेलापूर, सोलापूर आणि अहिल्यानगर इथं प्रचारसभा घेतील. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आज दुपारी नागपूर आणि नंतर वर्धा इथं जाहीर सभा घेतील. सांगली विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे उमेदवार पृथ्वीराज पाटील यांच्या प्रचारार्थ काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी प्रचारसभा घेतली. मणिपूरमध्ये तणाव असताना देशाचे प्रधानमंत्री मात्र परदेशात फिरत आहेत, अशी टीका खरगे यांनी या सभेत केली. राष्ट्रवादी काँग्रेस

शरदचंद्र पवार पक्षाचे उदगीरचे उमेदवार सुधाकर भालेराव यांच्या प्रचारार्थ पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी जळकोटमध्ये जाहीर सभा घेतली. महायुतीचे नेते निवडणुकीत पैसेवाटप करत असल्याचा आरोप यावेळी जयंत पाटील यांनी केला.

<><><><><>

दिल्लीच्या आम आदमी पार्टी मंत्रिमंडळाचे माजी सदस्य कैलाश गहलोत यांनी आज भाजपामधे प्रवेश केला. केंद्रीय मंत्री आणि पक्षाचे ज्येष्ठ नेते मनोहरलाल, पक्ष उपाध्यक्ष बैजयंत पांडा आणि दिल्ली भाजपा अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा यांनी त्यांचं स्वागत केलं. आम आदमी पार्टीच्या धारणांपेक्षा राजकीय महत्त्वाकांक्षा वरचढ होत असल्याच्या कारणावरुन गहलोत यांनी कालच पक्षसदस्यत्वाचा राजीनामा दिला होता.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सध्या तीन देशांच्या दौऱ्यावर असून आज सकाळी या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात ते ब्राझिलला पोहोचले आहेत. तिथं मोदी यांचं भारतीय जनसमुदायानं उत्साहानं जोरदार स्वागत केलं. ब्राझिलमधल्या रिओ डी जानिरो शहरात आयोजित जी – २० शिखर परिषदेला आज ते उपस्थित राहणार आहेत. शिखर परिषदेच्या निमित्तानं तिथे आलेल्या जागतिक नेत्यांबरोबर ते द्विपक्षीय चर्चा करतील. शिखर परिषदेमध्ये सहभागी होणाऱ्या नेत्यांमध्ये अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांचा समावेश आहे. गेल्या वर्षी नवी दिल्ली इथं झालेल्या जी–२० शिखर परिषदेच्या जाहीरनाम्यातल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने मोदी परिषदेत मांडणी करतील. 'न्यायसुसंगत आणि शाश्वत ग्रहाची आणि पर्यायांनं जगाची निर्मिती' असं यंदाच्या जी – २० शिखर परिषदेचं सूत्र आहे.

<><><><><>

नायजेरियामधून रवाना होण्यापूर्वी प्रधानमंत्र्यांनी तिथे राहणाऱ्या भारतीय समुदायाशी अबुजा इथं संवाद साधला. विकसित भारताचं उद्दिष्ट समोर ठेवून भारतानं प्रगतीच्या मार्गावर वाटचाल सुरु केली आहे, असं ते म्हणाले. आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रात भारतानं केलेल्या कामगिरीचा उल्लेख करुन ते म्हणाले की, जगाच्या दृष्टीने ही भारत आशेचा नवा किरण बनला आहे.

**<><><><><>**

दिल्लीतल्या वाढत्या प्रदुषणावर उपाययोजना करायला उशीर का केला, असा प्रश्न आज सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली सरकारला विचारला आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅन या उपायाची अंमलबजावणी करायला विलंब केल्याबद्दल न्यायालयाने दिल्ली सरकारवर ताशेरे ओढले आहेत. यापुढे उपाययोजनांची अंमलबजावणी थांबवायची असेल तर त्यासाठी न्यायालायकडून पूर्वपरवानगी घ्यावी लागेल, असंही न्यायालयाने म्हटलं आहे.

दिल्ली-एनसीआर परिसरातली हवेची गुणवत्ता आणखी खालावली आहे. दिल्लीचा सरासरी वायू गुणवत्ता निर्देशांक आज सकाळी ११ वाजेपर्यंत ४८७ इतका नोंदवला गेला असून ही अतिशय गंभीर स्थिती आहे.

**<><><><><>**

श्रीलंकेच्या नवनिर्वाचित मंत्रिमंडळाचा शपथविधी आज राजधानी कोलंबो इथं अध्यक्ष अनुरा कुमार दिसानायके यांच्या उपस्थितीत झाला. प्रधानमंत्री म्हणून डॉ. हरिणी अमरसूर्य यांनी तसंच अन्य २१ जणांनी पदाची शपथ घेतली.

**<><><><><>**

लक्झेंबर्ग इथं झालेल्या जीटी खुल्या तिरंदाजी स्पर्धेत भारताच्या ज्योती सुरेखा वेन्नम हिने काल महिलांच्या कम्पाऊंड प्रकारात सुवर्ण पदक जिंकलं.

ज्योतीने या स्पर्धेत सुरुवातीपासून शानदार खेळाचं प्रदर्शन केलं. बेल्जियमच्या साराह प्रील्स हिच्याविरोधात काल झालेल्या सामन्यात ज्योतीने १४७-१४५ असा विजय मिळवला.

दरम्यान, पुरुषांच्या कंपाउंड प्रकारात अभिषेक याने रौप्य पदक मिळवलं.

**<><><><><>**

कोलकाता इथं काल झालेल्या टाटा स्टील बुद्धीबळ भारत स्पर्धेत मॅग्नस कार्लसन याने ब्लिट्झ किताब जिंकला. उपांत्य फेरीत अर्जुन एरिगसी याच्याविरोधात कार्लसन याने बारा गुणांची कमाई केली. अंतिम फेरीत भारताच्याच विदित गुजराती याचा पराभव करून १३ गुणांची कमाई करत कार्लसनने ब्लिट्ज किताबावर आपलं नाव कोरलं. भारतीय खेळाडून अर्जुन एरिगसी, आर प्रज्ञानंद आणि विदित गुजराती हे अनुक्रमे तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या क्रमाकांवर राहिले.

**//<><><><><>//**

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१८ नोव्हेंबर २०२४ - सोमवार

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१८ नोव्हेंबर २०२४ - सोमवार